**ठळक बातम्या**

- राज्याच्या विविध भागात पावसाशी संबंधित दुर्घटनांमध्ये ६ जणांचा मृत्यू, मुंबई, ठाणे, रायगड, पुणे आणि साताऱ्यातल्या घाट परिसरात रेड अलर्ट

- राज्यात आज सर्वत्र दहीहंडीचा उत्साह, गोविंदा पथकांमध्ये दहीहंडी फोडण्यासाठी चढाओढ

- राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा घालून देणं राज्यघटनेच्या विरोधात असल्याची भूमिका सरकारकडून सर्वोच्च न्यायालयात सादर

- माजी मंत्री आणि भाजपा नेते पद्माकर वळवी यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**आणि**

- प्राध्यापिका, लेखिका डॉ. मोहिनी वर्दे यांचं निधन

**<><><><>**

मुंबई आणि परिसरामध्ये कालपासून सुरू असलेल्या जोरदार पावसात २ जणांचा मृत्यू झाला असून २ जण जखमी झाले. मध्यरात्री सुमारे २ वाजता एका घरावर दरड कोसळल्यानं ही दुर्घटना घडली.

आज सकाळी साडे ८ वाजता संपलेल्या २४ तासात सांताक्रूझ वेधशाळेत २४४ मिलिमीटर तर कुलाब्यात ८३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. सांताक्रूझमध्ये ऑगस्टमध्ये एका दिवसात झालेल्या सर्वाधिक पावसाचा हा गेल्या ५ वर्षातला विक्रम आहे. यापूर्वी ४ ऑगस्ट २०२० रोजी २६८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली होती. विक्रोळी, सांताक्रूझ, सायन आणि जुहू या परिसरांमध्ये २०० मिलीमीटरपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली. बांद्रा, भायखळा इथं दीडशे मिलीमीटरपेक्षा जास्त पाऊस झाल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे. आज सकाळपासून भायखळ्यात १०० मिलीमीटरपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. या पावसामुळं मुंबईत ठिकठिकाणी पाणी साचून जनजीवन विस्कळीत झालं आहे. यासंदर्भात मुंबई हवामान विभागाच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी अधिक माहिती दिली…

***होल्ड... बाईट- शुभांगी भुते***

**<><><><>**

राज्याच्या विविध भागांत पावसाचा जोर चांगलाच वाढला असून यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. याबद्दलचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून.

**होल्ड... व्हीसी**

***नांदेड*** *जिल्ह्यातल्या कंधार तालुक्यातल्या कोटबाजार इथं संततधार पावसानं काल रात्री कच्च्या मातीच्या घराची भिंत कोसळून पती-पत्नीचा मृत्यू झाला.*

***वाशिम*** *जिल्ह्यात कालपासून सुरू असलेल्या पावसानं सोयाबीन, हळद या पिकांचं प्रचंड नुकसान झालं आहे. रिसोड तालुक्यातल्या वाडी रायताळ इथं नाल्याच्या पुरामध्ये वाहून गेल्याचा एकाचा मृत्यू झाला.* ***यवतमाळ****मध्ये वीज पडून एकाचा मृत्यू झाला.*

***हिंगोली*** *जिल्ह्यातल्या कळमनुरी तालुक्यात कामठा फाटा ते येलकी रस्त्यावर ओढ्याला मोठा पूर आल्यानं येलकी, बेलथर, कसबे धांवडा या गावांचा संपर्क तुटला आहे. पिंपरी बुद्रुक इथल्या ओढ्याला पूर आल्यामुळं आखाडा बाळापूर ते पिंपरी, चिखली, कान्हेगावसह पाच गावांचा संपर्क तुटला आहे. ईसापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळं धरणाचे 2 दरवाजे नव्याने उघडण्यात आले असून ७ दरवाज्यांतून ११ हजार क्युसेकपेक्षा जास्त विसर्ग सुरू आहे.* ***लातूर*** *जिल्ह्यात धरण क्षेत्रात जोरदार पाऊस असल्यानं धरणांमधून अतिरिक्त पाणी सोडावं लागण्याची शक्यता आहे. त्यामुळं मांजरा, तेरणा आणि तावरजा नदीकाठावरच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा प्रशासनानं दिला आहे.* ***धुळे*** *शहर आणि जिल्ह्यात काल मध्यरात्री झालेल्या मुसळधार पावसामुळं शहराला पाणीपुरवठा करणारा नकाणे तलाव काठोकाठ भरला असून आज सकाळपासून तलावाच्या सांडव्यावरून पाणी ओसंडून वाहात आहे.* ***पालघर*** *जिल्ह्यातल्या पालघर आणि बोईसर शहरातही जोरदार पाऊस सुरू आहे.* ***बीड*** *जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून पावसानं हजेरी लावली असून अनेक महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. बऱ्याच ठिकाणी पिकं पाण्याखाली गेली असून नद्यांमधलं पाणी पात्र सोडून गावांमध्ये शिरलं आहे.* ***परभणी*** *जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून वादळी वारा आणि ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस सुरू आहे.* ***गडचिरोलीत*** *मध्यरात्रीपासून जोरदार पाऊस आहे.*

**<><><><>**

राज्यात गोकुळाष्टमीचा सण उत्साहात साजरा होत आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडीनिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दहीहंडीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यात विविध ठिकाणी दहीहंड्याचं आयोजन करण्यात आलं आहे. दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांमध्ये ही उत्साह असून गेल्या दोन महिन्यांपासून सराव केलेली दहीहंडी पथकं मानवी मनोरे रचत आहेत.

**ठाण्यात** प्रताप सरनाईक फाऊंडेशन आणि संस्कृती युवा प्रतिष्ठान आयोजित संस्कृती दहीहंडी मध्ये १० थर रचत कोकण नगरचा राजा गोविंदा पथकानं विश्वविक्रमाची नोंद केली. त्यांना २५ लाख रुपयाचे पारितोषिक जाहीर करण्यात आलं आहे.

**मुंबईत जोगेश्वरी इथली** दहीहंडी जय जवान गोविंदा पथकानं ९ थर लावून फोडली, तर **दादर**मधली आयडियल दहीहंडी महिला गोविंदा पथकानं फोडली. वरळी जांबोरी मैदान इथं भाजपाचे संतोष पांडे यांनी दहीहंडी उभारली आहे. ही दहीहंडी फोडण्यासाठी पथकांनी मोठी गर्दी केली आहे. शहर आणि उपनगरांत विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी लाखो रुपये बक्षीस असलेल्या दहीहंड्या उभारल्या आहेत. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि सेलिब्रिटींचीही रेलचेल आहे. दहीहंडीदरम्यान जखमी झालेल्या सर्व गोविंदांवर मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांत निःशुल्क उपचार करण्यात यावेत, असे निर्देश पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांचे अधिष्ठाता आणि वैद्यकीय अधीक्षकांना दिले आहेत. दहीहंडींमुळे मुंबई आणि ठाण्यात २२ मार्गांवरची बेस्टची वाहतूक वळवण्यात आली आहे.

**नागपूरच्या** महाल परिसरात बडकस चौक मित्र परिवाराच्या वतीने बडकस चौकात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या दहीहंडीला भेट दिली.

**<><><><>**

राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा घालून देणं राज्यघटनेच्या विरोधात आहे, असं उत्तर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात सादर केलं आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निकालाबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाला विचारलेल्या प्रश्नांवर सध्या सुनावणी सुरू

आहे. कलम २०० आणि २०१ नुसार अशी कालमर्यादा घालता येत नाही, विधेयकांवर निर्णय घेणं हा राष्ट्रपती आणि राज्यपालांचा अधिकार आहे, असं मेहता यांनी आपल्या उत्तरात म्हटलं आहे.

**<><><>**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं काल स्वातंत्र्यदिनी देशभरातल्या एक हजार १५० पथकर नाक्यांवर फास्टटॅग वार्षिक पास सुविधा सुरू केली. काल संध्याकाळी सात वाजेपर्यंत एक लाख ४० हजार जणांनी हा पास खरेदी केल्याचं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं सांगितलं. यात महाराष्ट्रातल्या नाशिक-पेठ, सूरत-दहिसर, सातारा-कागल, पुणे-सोलापूर, खंडाळा-सातारा, सांगली-सोलापूर, पाटस-बारामती, नागपूर-कोंढली, नागपूर-हैदराबाद, अमरावती-चिखली, करोडी-छत्रपती संभाजीनगर, मंठा-परतूर, वर्धा-बुट्टीबोरी इत्यादी ९६ मार्गांवरल्या पथकर नाक्यांचा समावेश आहे.

**<><><>**

माजी मंत्री आणि भाजपा नेते पद्माकर वळवी यांनी आज बुलढाणा इथं काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी मंत्री वसंत पुरके उपस्थित होते. लवकरच नंदुरबार इथं प्रवेश सोहळ्यात वळवी यांच्या सहकाऱ्यांचाही पक्षप्रवेश होईल, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितलं.

**<><><>**

प्राध्यापिका, लेखिका डॉ. मोहिनी वर्दे यांचं आज पहाटे निधन झालं. त्यांनी महर्षी दयानंद महाविद्यालय इथं वीस वर्षांहून अधिक काळ मराठी विषयाचं अध्यापन केलं. मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागात त्या अभ्यागत प्राध्यापक म्हणून अठरा वर्ष अध्यापन करत होत्या. त्यांनी कथा, कादंबरी, ललित गद्य, चरित्र, समीक्षा इत्यादी प्रकारांत विपुल लेखन केलं. ‘अधोरेखित’, ‘अभोगी’, ‘पाडिले वळण’, ‘बीजमंत्र’ हे कथासंग्रह, ‘किन्नर’, ‘टीझर’ या कादंबऱ्या तर ‘तनुभाव’, ‘सप्तक’, ‘सारस्वताचे हुंकार’ या ललित गद्यसंग्रहांचं त्यांनी लेखन केलं आहे. रखमाबाई: एक आर्त हे त्यांचं विशेष गाजलेले पुस्तक आहे.

**<><><>**

युक्रेन युद्ध समाप्तीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यात काल अलास्का इथं तीन तास चर्चा झाली, मात्र शस्त्रसंधीची

घोषणा झाली नाही. या बैठकीनंतर झालेल्या वार्ताहर परिषदेत ट्रम्प यांनी अतिशय सकारात्मक चर्चा झाल्याचं आणि अनेक मुद्द्यांवर सहमती झाल्याचं सांगितलं.

**<><><><>**

माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली. अनेक मान्यवरांनीही वाजपेयी यांच्या ‘सदैव अटल’ या स्मृतिस्थळावर पुष्पांजली अर्पण केली.

**//<><><><>//**